**वाचले क्र.**

१.शासन निर्णय क्रमांक प्रसूधा-१११९/प्र.क्र.३/१८अ,दि.०३/०२/२०२१

२.प्रशासन विभागाकडील आदेश क्र.प्रशा/१/कावि/९१०/२०२१ दि.०६/०९/२०२१

३.शासनाकडील अर्धशासकिय पत्र क्र.रांगाअ ११२२/प्र.क्र४०/१८-अ, दि.१७/८/२०२२

४.माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील मान्य प्रस्ताव दि.११/०८/२०२३

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र.मांतवि/१६/कावि/१७४/२०२३
दिनांक.११/०८/२०२३

**विषय : राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा २०२३-२४ करिता समन्वय अधिकारी व समिती अधिका-यांच्या नेमणूका करणेबाबत.**

**आदेश,**

उपरोक्त वाचले क्र.०१ चे शासन निर्णयान्वये प्रशासन लोकभिमुख करणे आणि त्यात निर्णय क्षमता आणणे आणि सर्वाच्या सहकार्यातून उत्तम प्रशासन कार्यान्वित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राजीव गांधी प्रशासकिय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा दरवर्षी "२० ऑगस्ट ते २ ऑक्टोबर " या कालावधीमध्ये आयोजित करणेबाबत कळविले आहे.या अभियानाची नियोजनबध्द पध्दतीने अंबलबजावणी होणे आवश्यक आहे. तसेच या तसेच या स्पर्धेअंतर्गत करणेत आलेल्या कार्यवाहीची माहिती/अहवाल शासन निर्णयात नमूद केलेल्या विहित कालावधीनुसार वळोवेळी विहीत विवरणपत्रात शासनाकडे पाठविणेबाबत कळविले आहे.तसेच शासकिय कर्मचारी व जनता ,सेवाभावी संस्था यांच्या माध्यमाने नाविन्यपूर्ण व लोकोपयोगी सुचना प्राप्त करून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी या अभियान कालावधीत आपल्याला करावयाची आहे. बदलत्या परिस्थितीमुळे नवीन तंत्रज्ञानामुळे व जागतिकीकरणामुळे प्रशासनामध्ये गती वाढविणे आवश्यक आहे.त्याकरीता शासनाने राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धेसाठी पुढीलप्रमाणे ७ (सात) कार्यक्षेत्र सुचविली आहेत. तसेच उपरोक्त वाचले क्र.०३ चे पत्रान्वये दि.०३/०२/२०२१ चे शासन निर्णयातील तरतूदीनुसार कामकाज करणेकामी निर्देशित केलेले आहे.

सदरचे अभियान दरवर्षीप्रमाणे दि.२० ऑगस्ट ते २ ऑक्टोबर या कालावधीमध्ये तालुका, जिल्हा, विभागीय स्तरावर व महानगरपालिका तसेच राज्य स्तरावर राबविण्यात येते. त्यानुसार सदरचे अभियान उक्त कालावधीमध्ये राबवून त्याबाबतचा प्रगती अहवाल विभागीय स्तर व राज्य स्तरावर विहीत विवरणपत्रांमध्ये भरून शासनास वेळोवेळी पाठवावा जेणेकरून अभियान व स्पर्धेत कोणकोणत्या कार्यालयाने भाग घेतला आहे याबाबत शासनास अवगत होण्यास मदत होईल.

महापालिका स्तरावर विषयांकित बाबतचे कामकाजाकरीता समन्वय अधिकारी व समिती अधिकाऱ्यांच्या पुढीलप्रमाणे नियुक्त्या करण्यात येत आहेत.

| **अ.क्र** | **अभियानांतर्गत स्पर्धेची कार्यक्षेत्रे** | **अधिकाऱ्यांची नावे व पदनाम** |
|---|---|---|
| १ | कार्यालयीन व्यवस्थापनामध्ये आधुनिक संकल्पना व व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब | श्री. मनोज लोणकर, उप आयुक्त – **कार्यक्षेत्र प्रमुख**<br>श्री. विजयकुमार थोरात, सहाय्यक आयुक्त<br>श्री. विजय सरनाईक, सहाय्यक आयुक्त<br>श्री.तन्मय गौंड, (emergency preparedness Consultant ) सी.टी.ओ.प्रतिनिधी |
| २ | सेवांची गुणवत्ता/दर्जा यामधील वाढ व उपक्रमांची परिणामकारकता | श्री. सुभाष इंगळे, उप आयुक्त– **कार्यक्षेत्र प्रमुख**<br>श्री. अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त<br>श्रीम. सुषमा शिंदे, सहाय्यक आयुक्त |

| | | |
|---|---|---|
| | | श्री. तन्मय गौंड, (emergency preparedness Consultant ) सी.टी.ओ.प्रतिनिधी |
| ३ | लोकभिमुखता | श्री. अजय चारठाणकर,उप आयुक्त– **कार्यक्षेत्र प्रमुख**<br>श्री. रविकिरण घोडके, सहाय्यक आयुक्त<br>श्रीम. उज्वला गोडसे, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी<br>श्री.स्वप्निल बसाखतरे, (Project Coordinator)<br>सी.टी.ओ.प्रतिनिधी |

| **अ.क्र** | **अभियानांतर्गत स्पर्धेची कार्यक्षेत्रे** | **अधिकाऱ्यांची नावे व पदनाम** |
|---|---|---|
| ४ | ई-गर्व्हनन्स | श्री. निळकंठ पोमण, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी– **कार्यक्षेत्र प्रमुख**<br>श्री. निलेश देशमुख, सहाय्यक आयुक्त<br>श्रीम. अनिता कोटलवार, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी<br>श्री.अनुराग तिवारी, (Sr. Sports Consultant)<br>सी.टी.ओ.प्रतिनिधी |
| ५ | संसाधनांचा पर्याप्त व प्रभावी वापर | श्री. प्रविण जैन, मुख्य लेखा व वित्त अधिकारी– **कार्यक्षेत्र प्रमुख**<br>श्री.रामदास तांबे, सह शहर अभियंता<br>श्री. संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता, पर्यावरण<br>श्री. बाबासाहेब गलबले, सह शहर अभियंता(वि/यां)<br>श्रीम. शिल्पा शशिधरन, (Project Coordinator)<br>सी.टी.ओ.प्रतिनिधी |
| ६ | तंटा/तक्रार मुक्त कार्यालय | श्री. मकरंद निकम, शहर अभियंता– **कार्यक्षेत्र प्रमुख**<br>श्री. मिनिनाथ दंडवते, उप आयुक्त<br>श्री. उदय जरांडे, मुख्य सुरक्षा अधिकारी<br>श्री. स्वप्निल बसाखतरे, (Project Coordinator)<br>सी.टी.ओ.प्रतिनिधी |
| ७ | नविन्यपूर्ण व पथदर्शी स्वरूपाच्या संकल्पना/ प्रयोग/उपक्रम | श्री. प्रमोद भोसले, मुख्य लेखा परिक्षक– **कार्यक्षेत्र प्रमुख**<br>श्री. ज्ञानदेव जुंधारे, सह शहर अभियंता<br>श्री. प्रमोद ओंबासे, सह शहर अभियंता<br>श्रीम. शिल्पा शशिधरन, (Project Coordinator)<br>सी.टी.ओ.प्रतिनिधी |
| ८ | या अभियानंतर्गत उत्कृष्ट काम करणारे विभाग, अधिकारी/कर्मचारी यांचे प्राप्त अर्जांचे मुल्यमापन करणे | श्री. विजय खोराटे, अतिरिक्त आयुक्त – **कार्यक्षेत्र प्रमुख**<br>श्री. चंद्रकांत इंदलकर, सह आयुक्त<br>श्री. विठ्ठल जोशी, उप आयुक्त<br>श्री. प्रमोद जगताप, कामगार कल्याण अधिकारी<br>श्री. अनुराग तिवारी, (Sr. Sports Consultant)<br>सी.टी.ओ.प्रतिनिधी |

वरील समित्यांचे समन्वय अधिकारी म्हणून श्री. चंद्रकांत इंदलकर, सह आयुक्त यांची नियुक्ती करणेबाबत तसेच अहवालाच्या संगणकीकरणाची जबाबदारी श्री. निळकंठ पोमण, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचेवर सोपविणेत येत आहे. उपरोक्त कार्यक्षेत्र प्रमुखांनी २० ऑगस्ट ते ०२ ऑक्टोबर २०२३ या कालवधीत साप्ताहिक बैठक घेऊन गुणात्मक व संख्यात्मक (Qualitative & Quantitative) साप्ताहिक अहवाल समन्वय अधिकारी यांचेकडे पाठविण्याची कार्यवाही दर शुक्रवारी करणेत यावी.

सदरचे अभियान राबविण्यासाठी अतिरिक्त पैसा व अतिरिक्त अधिकारी/कर्मचारी उपलब्ध करून दिले जाणार नाहीत.कामकाजाचे अनुषंगाने सर्व विभागप्रमुखांनी त्यांचे नियंत्रणाखालील कर्मचारी यांचेकडून कामकाज करून घ्यावयाचे आहे.तसेच प्रस्तुतचे आदेशानंतर वरील अधिकारी जर सेवानिवृत्त, राजीनामा, स्वेच्छा सेवानिवृत्ती अथवा बदली झाल्यास अशा अधिकाऱ्यांचे जागेवर पर्यायी येणाऱ्या अधिका-यांने या अभियानामधील नेमणूक दिलेल्या कार्यक्षेत्राचे कामकाज करावयाचे आहे, याची नोंद घ्यावी.

सही/-

(शेखर सिंह)

**आयुक्त,**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी ४११ ०१८**

प्रति.
प्रत सर्व संबंधित विभाग